नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०४/२०२५ (शुक्रवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हा अंतर्गत पोलीस स्टेशन काटोल आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे घेण्यात आली पोलीस पाटलांची बैठक.

आगामी सणोत्सवा दरम्यान नागपुर ग्रामीण जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन काटोल आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे पोलीस पाटलांची बैठक घेण्यात आली आहे.

आज दिनांक ०४/०४/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांनी **पोलीस स्टेशन काटोल** येथे पोलीस पाटील यांची बैठक आयोजीत केली होती. तसेच सहा.पोलीस निरीक्षक श्री जयप्रकाश निर्मल, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन भिवापूर यांनी **पोलीस स्टेशन भिवापुर** येथे पोलीस पाटील आणि सणोत्सवा दरम्यान निघणाऱ्या मिरवणूकींचे चे आयोजक यांची बैठक आयोजीत केली होती. सदर बैठक आगामी येणाऱ्या श्रीराम नवमी, भगवान महावीर जयंती , हनुमान जयंती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त्य घेण्यात आली होती. सदर बैठकीत आगामी सणोत्सव शांततेत पार पाडणेबाबत, जातीय सलोखा ठेवुन कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मिरवणुकी दरम्यान कोणत्याही प्रकराची जातीय तेढ होवुन धार्मिक भावना दुखावतील असे वर्तन करू नये.याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

# पोलीस स्टेशन काटोल





## पोलीस स्टेशन भिवापुर



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, रामटेक पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक** :—दिनांक ०३/०४/२०२५ रोजी रामटेक पोलीस, हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा वाहीटोला रामटेक येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान संशयीत १२ चक्का ट्रक क्रमांक एम. एच ४० सी. टी. ७५७३ हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रक चालक आरोपी नामे होमेंद्र श्रीचंद सहारे, वय— ४० वर्षे रा.साहु प्लाट नं.३० ,सिंमेट रोड, सुजाता ले आउट, नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच रेतीची वाहतुक **ट्रक मालक आदित्य नामदेवराव इंगोले रा.वार्ड क्र.०६, हनुमान नगर, वानाडोंगरी, नागपुर** यांच्या सांगण्यावरून करीत

असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) १० ब्रास रेती किंमती ६०,०००/—रूपये आणि २) ट्रक क्रमांक एम.एच ४० सी टी ७५७३ किंमती २५,००,०००/—रूपये असा एकुण २५,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**ट्रक चालक आरोपी नामे होमेंद्र श्रीचंद सहारे, वय ४० वर्षे, रा.साहु प्लॉट नं.३० सिंमेट रोड, सुजाता ले आउट, नागपुर आणि मालक आदित्य नामदेवराव इंगोले, रा.वार्ड क्र.०६ हनुमान नगर, वानाडोंगरी नागपुर याच्या विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## कन्हान पोलीस ,नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०३/०४/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, चंदारी निनकु सहानी रा. शिवनगर कांद्री, ता. पारशिवणी हा त्याचे राहते घरामध्ये अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करतो. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अरोपी नामे **चंदारी निनकु सहानी, वय ५४ वर्ष, रा. शिवनगर कांद्री, ता. पारशिवणी ,जि नागपुर** याला ताब्यात घेतले आणि नमुद आरोपीचे ताब्यातुन ५९२ ग्राम अंमली पदार्थ गांजा, किंमती ५९००/— **रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

आरोपी नामे **चंदारी निनकु सहानी, वय ५४ वर्ष, रा. शिवनगर कांद्री, ता. पारशिवणी ,जि नागपुर** याच्या विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कन्हान पोलीस करत आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**